सकाळ दि. 23.8.25

# ऑनलाइन फसवणूक झालेल्यास मिळाला दिलासा

## नांदेड शहरातील सायबर पोलिसांची सजगता, पाच लाख रुपये परत

सकाळ वृत्तसेवा

**नांदेड ता.२२ :** सायबर पोलिस ठाण्याच्या सजगतेमुळे ऑनलाइन फसवणुकीच्या प्रकरणात तक्रारदाराचे तब्बल पाच लाख रुपये होल्ड करण्यात येऊन न्यायालयाच्या आदेशानंतर परत मिळाले आहेत. या कारवाईमुळे फसवणुकीच्या जाळ्यात अडकलेल्या तक्रारदाराला दिलासा मिळाला आहे.

विमानतळ पोलिस ठाण्यात ता.१६ सप्टेंबर २०२४ रोजी ऑनलाइन तक्रार दाखल करण्यात आली होती. तक्रारदाराने एक ऑनलाइन जाहिरात पाहून त्यामध्ये अधिक नफ्याचे आमिष दाखविल्याने तब्बल १५ लाख रुपये गुंतवले होते. मात्र सदर कंपनीने नफा किंवा मूळ रक्कम देण्यास नकार देत टाळाटाळ सुरू केली. त्यातून ऑनलाइन फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तक्रारदाराने सायबर पोलिस ठाण्यात धाव घेतली.

पोलिस अधिकारी व अंमलदार यांनी तातडीने दखल घेतली. त्यातून तक्रारदाराचे पाच लाख रुपये होल्ड केली. नांदेडचे मुख्य न्यायदंडाधिकारी द्वितीय न्यायालय यांच्या आदेशानंतर ही रक्कम परत करण्यात आली. ही कारवाई पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक सूरज गुरव, अर्चना पाटील, पोलिस निरीक्षक वसंत सप्रे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कामगिरीत पोलिस उपनिरीक्षक चव्हाण, काशिनाथ कारखेडे व दीपक राठोड यांनी सहभाग घेतला.




### हेल्पलाइन नंबरवर करा कॉल

**ऑनलाइन फसवणूक झाल्यास तातडीने १९३० या सायबर क्राईम हेल्पलाइन नंबरवर कॉल करावा किंवा cybercrime.gov.in या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी त्यानंतर जवळच्या पोलिस ठाण्यामध्ये तक्रार दाखल करावी असे आवाहन पोलिस दलाकडून करण्यात आले आहे.**